422*आडमार्गावर पाय जर पडला तर आई, बाप, देव, गुरू नाही तारणार. देवाची टाप नाही त्याचे भोग बंद करायची.
423*भ्रष्ट आचारी लोक जे जन्माला येतात त्यांना किती शिकवल, किती सांगितल तरी ते ऐकणार नाहीत.
आपली चिंता क्षणाक्षणाला, आहे जगद्गुरु जनार्दनाला.

8

अमृतवाणी
प.पू.जनार्दन स्वामींची
अमृतवाणी

424• सतत नामस्मरण करणाऱ्या लोकापुढे मोक्ष कैलास वैकुंठ भुसकट आहे.
425•नाम आहे ज्याच्यापासी जेथे बसेल तेथे काशी.
426• मंत्र गुरुच्या मुखातुन घ्या. पुस्तकातुन घेवु नका. ज्यावेळी गुरुमंत्र मिळतो त्यावेळी आपला नवा जन्म होतो.
427.ज्यावेळी प्रसंग येतो त्यावेळी माणसाने चिंतन करावे,चिंता करु नये.
428• नाम श्रेष्ठ सर्वा ठायी।ऐसी वेद देती ग्वाही।
429• वेदाने सुद्धा साक्ष दिली आहे की सर्वात श्रेष्ठ देवाचे नाव आहे.
430•तुकाराम महाराज म्हणतात ज्याचं चित्त आणि नाम एक झाले आहे मी त्यांचा दास आहे.
नामरुपी जडले चितात्यांचादासमीअंकीत।
431•देवा तुझ्या नामाचा महिमा इतरांना काय पण तुला सुद्धा कळाला नाही, तो संतांना कळाला.
432.तुझ्या नामाचा महिमा।तुजन कळे मेघशामा।
433•गुरुने दिलेला मंत्र जपल्यावर कोणतेही पाप रहात नाही.
तृण अग्नी मिळे समरस झाले।तैसे नाम केले जपता हरी।
434• एवढे पाप देवाच्या नावाने जात. पण देवाचे नाव न घेणे हे पाप कशाने जात नाही. जी वाचा नेहमी
देवाच नाव घेते तिला सती म्हटलं आहे. -ॐ जनार्दनाय नमः।। .

8
edited

अमृतवाणी
। प.पू.जनार्दन स्वामींची।
अमृतवाणी

435*निरपेक्षाच्या हातचा यज्ञ म्हणजे काय बाबा.निष्काम जर यज्ञ झाला,जेवढे येथील खातील, पेतील
त्यांचा उद्धार होईल. कारण महाप्रसाद आहे. तो महापुरुषांचा हातचा आहे. महापुरुष म्हणजे कोण जो
कधी कोणाच काही घेत नाही.
436*रामेश्वर तीर्थ फार भारी आहे. महादोषी लोक तेथे जावुन आपल्या दोषाच क्षालन करतात.
437*जे मानासाठी पानासाठी हापापलेले लोक आहे, त्यांच्या मानाने अभिमानाने त्यांचाच नाश होईल.
438*मानाचे पानाचे वैभवाचे हापापलेले यांच्याने काय धर्माचरक्षण होत
439*दोषी, वैरी, निंदा करणाऱ्या मानसाला पुण्य नसते.
440*संत कसे पाहिजे त्यांना सन्मानाची इच्छा नको.
441*शिव हे दोनच अक्षरे आपल्याला तरणोपायाचे आहे. या जगात दुसर कोणी नाही
आपले भय नाहीसे करणारा तोच आहे
442*दोन बायकांचा दोन गुरुंचा व्यवहार हाखोटा आहे.
443*विषय आनंद हा क्षणिक आहे. विषय आनंद ज्याने सोडला तो परम आनंदात जातो...ॐ जनार्दनाय नमः।।.

8

अमृतवाणी
प.पु.बाबाजींच्या
अमृतवाणीतुन
444* परमेश्वराने आधी धर्म उत्पन्न केला मग जनता उत्पन्न केली.
445* देवाच्या आधी धर्म आहे, धर्म हाच तुम्हाला तारील.
446* ब्रम्हा, विष्णू, महेश यांची आपण प्रार्थना करतो,पण ब्रम्हा, विष्णू, महेश धर्माची प्रार्थना करतात.
447* आपला देव धर्म आहे धर्म जर नाही तर देव नाही.
448* प्राणिपात, स्तुती,उपासना,चरणांचे स्मरण, कथा श्रवण, सर्व कर्म समर्पण
हे सहा अंग जर असतील तर त्याला भक्त म्हणतात.
449* या जगात जर आपण तरत असाल तर धर्माच्या आधारे तरतो.
450* ब्रम्हा, विष्णू,महेशाला सुध्दा गणपतीची पूजा करावी लागते.
451* धर्माचे अंग, भक्तीचे अंग, सत्याचे अंग हे जर तुम्ही बाळगले तर मोठे मोठे लोक जन्माला येतील.
452* आपल जर शील सुटल तर आपण काही उपयोगाचे नाही.
453* सतत उदयोग करायला भाकरीची ताकद नाही लागत त्याला शीलाची ताकद लागते.
454* ज्याच्यात शील असेल तो रात्रंदिवस उयोग करील.
455* सुख कशात आहे जो कष्ट करतो, भाजी भाकर खातो यात सुख आहे.
456* कोणाच्या कुटाण्यात सुख आहे का ? कोणाच्या निंदेत सुख आहे का ? कामात सुख आहे.
457* कष्ट करायला ताकद लागते ही ताकद शरीराची, पैशाची, राजाची नाही, तर
458* सतत उद्योग करा आणि शील रहा, या दोन्ही वस्तू एकत्र करण याला बेरीज म्हणतात.
459* मैत्रीत मत्सर घालणे हा खर्च आहे. मैत्रीतून मत्सर काढा याला वजाबाकी म्हणतात.

460* निंदेसारख कोणतेही पाप नाही. निंदा म्हणजे बदामाच्या शिऱ्यामध्ये जहर आहे. शिरा खायला गोड लागतो निंदा करायला गोड लागते पण शेवटला विष चढलं की टपकन मरून पडतो
461* निंदा करायला गोड लागते पण त्याचा सत्यानाश होईल निंदासारख पाप नाही.
ताकद शील पाहिजे.
ॐ जनार्दनाय नमः।।

7

अमृतवाणी
बाबाजी ची अमृतवाणी
462.प्रल्हादाची पुजा कोणती,अखंड नामस्मरण, मात्र
463•ज्याने विठ्ठल मात्रा घ्यावी।त्याने पथ्य सांभाळावी।
464• एक माळ मोठ्या आवाजात जपल्यास एकपट पुण्य, एक माळ हळु अवाजात जपल्यास दहापट पुण्य.मनात जपल्यास शंभरपट पुण्य. ध्यानात जपल्यास पुण्य विचारु नका,डोळे झाकुन जप करा.
465• वाल्ह्या महापापी पण दोनच अक्षरांचा मंत्र नारदाने दिला. त्याचा उद्धार केला. वैकुंठात वंद्य केला. कारण मंत्राआधीन देवता पण तो मंत्र कुणाच्या मुखातुन पाहिजे
466•टाकोनी संसाराची आस्था।जोलागला भक्तीपंथा।
तोची अधिकारी भागवता।परमार्थ ग्राहकू॥
467• यांच्या मुखातुन आपल्याला मंत्र मिळाल्यावर तो आपोआप अच्युत पदाला नेतो.
468• देवाच्या नावात किती ताकद आहे हे फक्त संतांनाच माहीती आहे. एवढा महान पापी नारदाने उद्धारुन टाकला वैकुंठात वंद्य केला.
469• पापाचे पर्वत भस्म नाम अगणित. परमेश्वराचे नाम पापाचे पर्वत जरी असले तरी नाहीसे करतील पण तसी भावना पाहिजे,आवड पाहिजे.
470• हजार जन्माच जर पुण्य असेल तर मुखात एकवेळा रामाच नाव येईल.
471.सिर्फ राम म्हटल तरी सर्व काम होतात कारण हा अवतारशील आहे.रामाच नाव घ्या पण रामासारख वागा.
472.रामाच्या नावात किती महिमा आहे हे फक्त शिवालाच माहिती आहे.
473• आवड पाहीजे आदर पाहीजे मग तुमचे कोणतेही काम रहाणार नाही.
474.आवडीआदरे आधी आले नाम।त्याने झाले माझे सर्व काम।
475.देवाच्या नामाची,रूपाची, त्याच्या भक्ताची किंमत होणे अशक्य आहे.
476• मृत्युंजयाचा जप करतो त्याला कोणताही जप करायची गरज नाही.याच्यात सगळ आल.
477•चिंता हे तुमच मरण आहे. चिंता करु नये. चिंतन करावं भगवंताच.
478• सतत नामस्मरण करणाऱ्याला कोणताही त्रास होणार नाही.
479• देव म्हणतात मला स्वर्ग, वैकुंठ, कैलास आवडत नाही. मला कोण आवडतो जो नामस्मरण करतो.
.ॐ जनार्दनाय नमः।।

5

अमृतवाणी
निष्काम कर्मयोगी।।.
प.पू.बाबाजींच्या
प.पू.जनार्दन स्वामी महाराज
अमृतवाणीतुन यांच्या प्रवचनातुन संकलीत
480*आयत्या पिठावर काय रेघा ओढता. काही घाम गाळाना. लोकांना काही खाऊ घाला. याला परोपकार म्हणतात.
481*तुम्ही कोणाच कर्ज ठेवू नका. पण कबुल केल ते पण ठेवू नका. यामुळे माणुस निर्मळ होईल.
482*जारण मारण विद्या कोणावर चालते? जे धर्माला सोडुन वागतात, जे लोकांच नुकसान
483*करतात, जे दारु पितात, बोकडे खातात, कपट करतात, विश्वासघात करतात यांच्यावर हे विघ्न आहे.
484*जगाच कल्याण करणारा हाच साधु, हाच गुरु, हाच परोपकारी.
485*आईला काही लाभ आहे का त्या पोराचा.
स्त्रीया असंख्य मिळती जगती,
परी माता न मिळे त्रिजगती.
486*आडल्याला आडवु नये माणसाने.
487*तुम्ही नुसत शिव म्हणा आणि प्रपंच करा. तरी ते परमार्थाचे घर होईल.
488* स्कंदपुराण म्हणजे कार्तीक स्वामीच्या मुखातील उद्गार आहे की आपल्याला जर मोठ व्हायचं असेल तर प्रथम विद्या अभ्यास आहे.
489*ज्याच्या अंगात तप आहे, त्याने जे बोले ते होते.
490*ज्याच्या पदरी पुण्य आहे त्याच्या पदरी देव आणि जग राबत. जग राबायला काय लागते, पुण्य लागते.

ॐ जनार्दनाय नमः।।

5

अमृतवाणी
प.पू.जनार्दन स्वामींची
अमृतवाणी
491* तुमच्याकडुन जेवढे अपराध होतील तेवढे मंत्र विधीमध्ये ठेवले आहे. तुमच्या केसाला सुध्दा धक्का लागणार नाही.
492* ज्या बाईला नवरा नाही तीच जीवन व्यर्थ आहे तसे ज्या माणसाला गुरु नाही त्याचे जीवन व्यर्थ आहे.
493* गुरुच ऐकेल तोच दास. गुरुपासुन जे सुटले ते भ्रमात पडले.
494* निंदा करताना गोड लागते. पण त्याचा सत्यानाश होईल.

495* आपण ब्रह्मा, विष्णु, महेश यांची प्रार्थना करतो पण ब्रह्मा, विष्णु, महेश धर्माची प्रार्थना करतात.
496* तुम्ही विश्वासघात केला तर, तुमचा घात झाल्याशिवाय राहणार नाही.
497* परमेश्वराचे नाम पापाचे पर्वत नाहीसे करतील. पण तसी भावना पाहीजे आवड पाहीजे.
498* अघोर पाप जरी असेल आणि तुम्ही अग्निला आवाह्न केल तर कोणतही पाप तुमच्यात राहणार नाही.
499* कोणतही विघ्न तुमच्यापाशी येऊ शकणार नाही असे हे नम: शिवाय,
500* दारु पितात बोकडे खातात तेथे अवदसा आहे.
501.गायीच्या शेणात हात घाला पाठीवरुन हात फिरवा सगळ्या पापाचा नाश आहे.
502* अंत:करण दुषीत असल्यास संतापासी गेले काय, देवापासी गेले काय, काही उपयोग होणार नाही.
ॐ जनार्दनाय नमः।। ---------..




निष्काम कर्मयोगी..
503*जो विषयाचे जहर पचवील तोच परमार्थ करील.
504* संतांना सर्व सारखेच असतात कोणी लहान नाही कोणी मोठा नाही.
505*आई-बापाला जो सोडील त्याला तिन्ही लोकात जरी गेल तरी सुख भेटनार नाही.
506* तुमच्या वंशाला दिवा पाहीजे मगशंकराच्या मंदिरात दिवा लावा.
507*कोणाचे फुलसुध्दा अंगावर घेऊ नये. सन्मानाची इच्छा करु नये.
508*जेथे गर्व अभिमान ताठा आहे तेथे देव येत नाही.
509* परक्याला दुख देऊन कालत्रयी सुख भेटणार नाही.
510*दारुचे व्यसन उतरते. पण विषयाचे व्यसन उतरत नाही.
511*वीर्य दाबुन धरणे याला धैर्य म्हणतात. वीर्यच नाही तर धैर्य कोठुन येणार.
512* जाती दोनच आहे, सुजात आणि कुजात. सुजात म्हणजे चांगले कर्म करणारे. कुजात म्हणजे वाईट कर्म करणारे.
513* मुलांची सेवा हीच माझी सेवा, या मुलांची विद्यार्थ्यांची जो कोणी सेवा करील ते मला आवडतील.
514* सुखाची इच्छा सर्व करतात पण सुख कशात आहे याचा विचार कोणी करतो का? सुख संतांजवळ आहे. त्यांचेकडे जात्यांची सेवा करा.
516* ज्याचा मी तु पणा गेला तो खरा संन्याशी झाला.
517*बाबाच तत्व पाळा अभय व्हाल.
518* भागवत जो कोणी पाहत असतील बाबा त्याचे दास आहे.
519* तुम्हाला जर सर्वेश्वर पुजायचा असेल तर मनात मत्सर ठेऊ नका.
कोण्याही जीवाचा नघडी मत्सर ।
मर्म सर्वेश्वर पुजनाचे॥
520* ज्याला भक्ती करायची असेल त्याने केव्हाही कोणाला त्रास देऊ नये.
521*जे मास खातात त्यांच्या बुध्दया क्रुर होतात.
522*शंकराची पुजा आरती करणे हा खरा धर्म आहे. त्या घरात व्याभीचार येणार नाही.
.ॐ जनार्दनाय नमः




||निष्काम कर्मयोगी ।।
523. परमेश्वर ज्याच्या हातुन जे करुन घ्यायचते त्याच्या हातुन करुनच घेतो.
524• आपल्याला प्राणायम करता येत नाही कारण प्राणायम करायला मोजकचखाव लागेल.
525• भक्तीची वाट पूसायची असेल तर मारुतीलाच पुसा. भक्तीची वाट दाखवायला तोच एक समर्थ आहे.
526• तुम्ही संसारातुन तुमच्या मनाला काढुन देवाच्या चरणावर लावाल तर का तुम्ही देवाला आवडणार नाही?
527• विंचवासारखे ठणके देणारे माणस, दुष्कर्म करणारे माणस यांच्यापासुन दुर रहाव यांना दुरुन वंदन कराव.
528• भगवंताची भक्ती प्राप्त झाल्यानंतर तुम्हाला काही कमी पडणार नाही.
529• दिल्याशिवाय तुम्हाला काही मिळणार नाही.एकतर हरीनाम घ्या नाहीतर अन्नदान द्या.तपापेक्षा अन्नदान जास्त श्रेष्ठ आहे. लेने को हरीनाम, देणे को अन्नदान.
530.अन्नदान करा,भुमीदान करा ,गायदान करा ,पाणीदान करा. दानाशिवाय आपला उध्दार होणार नाही.दान करायचे नसेल तर हरीमुखे म्हणा हरीमुखे म्हणा, पुण्याची गणना कोण करी.
531• नवरा-बायको मध्ये संतोष असेल तर प्रपंच चांगला चालेल वसंततीपण मनासारखी होईल.
532. आपल्या नाशाला मुळ कारण हा अभिमान आहे.
533• ज्याने हदयात संतोष साठवला आहे देव त्याच्यावर कृपा करतो.
534• दुसऱ्याला कचऱ्यासारख समजन हेच बंधन आहे. मोठही म्हणायच नाही. लहानही म्हणायच नाही. सम म्हणायच याला ज्ञान म्हणतात.
535.पाप, ताप, दैन्य हया तीन प्रकारचे जाळे मनुष्यावर आहे.परमार्थाच्या सहाय्याने हे झटकुन टाका.
536.अभिमानी लोकांना एकमेकांच बर दिसत नाही.
.ॐ जनार्दनाय नमः।।.




प.पु.बाबाजींची अमृतवाणी
सद्‌गुरु
सोनंज्या पेटीत ठेवलं आहे तिला सोन्याची पेटी
म्हणतात. पेटी जरी लोखंडाची पण तिच्यात सोन

म्हणून तिला सोन्याची पेटी म्हणतात. अस मृत्यूलोकांत
परमेश्वराचा शंकराचा बोध ज्यांनी अंतकरणात घेतला
त्यांना गुरू म्हणतात. यो गुरू सर्व देवांना ।
यकाराय नमो नमः।
सगळ्या देवांचा गुरू शंकर आहे.
तप केल्याशिवाय देव भेटत नाही.
दिल्याशिवाय प्राप्त होत नाही. आणि गुरूशिवाय गूह्य
गोष्ट कोणीच सांगत नाही.तपेविन दैवत । दिधल्याविना प्राप्त ।
गुजेविण हित कोण सांगे ।
गुरूला सोडून देवाला सोडून ज्ञान घेणे अज्ञान आहे नवऱ्यापाशी राहील तीच सती. गुरूच ऐकेल तोच
दास. देवापासी राहील तोच अनन्य भक्त/गुरूपासून देवापासून नक्यापासून जे सुटले ते भ्रमात पडले
व्याभीचारी झाले. आपला आत्माराम सोडून इतर ठिकाणी फिरणे अज्ञान आहे. आपली इंद्रीये आपल्या
ताब्यात नाही, तर गुरू करून उपयोग नाही.)
ज्यांचे चित्त शुध्द झाले नाही, त्याला गुरू करील काय, त्याला देव काय करील.
गुरू ज्यावेळी भक्ती देतो म्हणजे बोध करतो आणि आपल्या अज्ञानाचा नाश करतो ज्याला घ्यायचे तो घेतो.
शिष्याने नऊ रत्नाचा हार गुरूच्या गळ्यात घालावा:-
१) सन्मानाची इच्छा न करणे २) निर्मत्सरता ३) निर्ममता ४) दक्षता ५) गुरूसी आप्तपणा
६) जिज्ञासूपणा७) निश्चलता ८) सत्य आणि पवित्र भाषण ९) अनुसया
ज्या बाईला नवरा नाही तिचं जीवन व्यर्थ आहे. ज्या माणसाला गुरू नाही त्याचं जीवन व्यर्थ आहे.
ज्याने गुरू नाही केला । त्याचा जन्म वाया गेला ।
ज्या बाईला नवरा नाही, ज्या चेल्याला गुरू नाही अशांच रक्षण होत नाही. वेद आहे शास्त्र आहे, पुराण
आहे पोथ्या आहे कशाकरिता तुम्ही चांगले सोयीनं वागाव यासाठी आहे. हे सगळ मुखात आहे. पण सांगून
कोणाला तारण अवघड आहे.
तोचि ज्ञानी खरा । तारी दुजयासी।
वेळोवेळी त्यासी शरण जावे।
जो मनुष्य दुसऱ्याला तारतो त्याच्या पाया पडा. कारण तो काय करील
शरण गेलीया काय होते फळ । तुका म्हणे कुळ उध्दारिले ।
आपली चिंता क्षणाक्षणाला | आहे जगद्गुरु जनार्दनाला।।
२




।बाबाजी ची अमृतवाणी
गुरूशी काय केल पाहिजे आप्तपणा. या जगात आपला खरा आप्त गुरू आहे बाकी कोणी नाही.
गुरूविणे देव नाही दुजा । पाहता त्रैलोकी ।
जेथे जेथे जाय मन । जेथे सद्गुरू चे पाय दोन ।
मंत्राधीन देवता जो मंत्र जपेल त्याच्यापासी देव येईल. पण खरा मंत्र म्हणजे साधू संत यांच्या मुखातून पाहिजे. मंत्र जर
आपल्याला नाही तर आपलं जीवन व्यर्थ आहे. दोनच अक्षरे का होईना पण गुरूच्या मुखातून पाहिजे. तर मनुष्याचा उध्दार
होतो. जसे लग्नाच्या बायकोपासून पोर झाले तर ते योग्य. इतर ठिकाणी जगभर पोर केले तरी योग्य नाही. अस पुस्तकातून
मंत्र घेणे बिनगुरूच्या साधूकडून मंत्र घेणे याचप्रमाणे आहे. संसार करण्यासाठी जसी बायकोची जरूरी आहे तस परमार्थ
करण्यासाठी गुरूची जरूरी आहे.
मंत्र तंत्र उपदेशिती । घरोघरी गुरू आहेत आयते ।
जो शिष्यासी मेळवे निजवस्तुते । श्रीकृष्ण त्याते सद्गुरू मानी ।
vगुरूने दिलेले मंत्र जपल्यावर कोणतेही पाप राहत नाही.
गुरूने ज्ञान दिलं पण आपण ते वापरलं नाही तर त्याचा काय उपयोग. त्या मार्गाने शिष्याने चाललं पाहिजे. आपला गुरू
सोडून लाखो साधू पाहिले लाखो तत्व बाळगले तरी काही होणार नाही.
ज्यांनी गुरूला त्रास दिला त्यांच्यापाशी असलेलं पुण्यखलास ....!
एवढे विद्वान बनले चर्चा केली शब्दाचा कोष तयार केला पण गुरूच सामर्थ्य नाही कळलं सगळ वाया गेलं.
अरे ज्याला जीव विकला त्याचेच कार्य करा. ज्या गुरूपाशी गेले त्याचेच कार्य करा. हिंडता कशाला मोकारासारखे.
वाल्या महापापी पण दोनच अक्षराचा मंत्र नारदाने दिला त्याचा उध्दार केला. वैकुंठात वंद्य केला. कारण मंत्राधीन
देवता, पण तो मंत्र कुणाच्या मुखातून पाहिजे.
टाकोनि संसाराची आस्था । जो लागला भक्तीपंथा ।
तोचि अधिकारी भागवता । परमार्थ ग्राहकू
यांच्या मुखातून आपल्याला मंत्र मिळाल्यावर तो आपोआप अतिउच्च पदाला जातो.
आपले सद्गुरूच आपल्याला ज्ञान देतील तेच आपल्याला वाट दाखवतील. आपल्याला ज्ञानार्जन करतील. पण काही
लोक गुरूवर देखील श्रध्दा ठेवीत नाही. जवळ राहतात सेवा करतात पण त्यांची भावना विचलीत होते.
खरा बाप ओळखा.खरा पिता सद्गुरु आहे म्हणून साधूची सेवा करा. त्यांची सेवा जर केली तर तुम्हाला काही कमी
पडणार नाही.
ज्या प्रमाणे एखादी मुलगी एकदा नवऱ्यापासी गेल्यावर त्याच्याच तोंडाकडे तिचं लक्ष असत, इकड तिकड भटकत
नाही. तेव्हा तिला पतीव्रता म्हणतात. असे गुरू काय सांगतात गुरू काय मागतात त्यांच्या शब्दावर जो विश्वास ठेवील तोच
शिष्य.टेंपरवारी लोकांचे हे काम नाही.
'जे साधन करतात गुरु त्यांची माय बनतात. पण कोणाची जे सत्य असतात. असे जे सत्य माणसं जे सत्कर्म करतात
ते आपणही तरतात व दुसऱ्यासही तारतात.
गुरू सत्यालागी सहाय्य । गुरु साधकाची माय ।
सर्वात महत्व गुरूला आहे. गुरूसारखी कोणतीही वस्तू नाही. म्हणून गुरूला ओळखा तुम्ही तराल. पृथ्वी आहे

तिथपर्यंत तुम्ही अमर रहाल. जगाचा उद्धार कराल पण साडेतीन चार वाजता उठा. पाच वाजता निदान सुर्योदयाआधी तरी
जेथे जेथे जाय मन । तेथे सद्गुरू पाय दोन ।
जो गुरूच ध्यान करील त्याच सगळं पाप मिटून जाईल.
जो गुरूची मर्यादा धरील गुरू त्याच्या हातात किल्यादेतील. या किल्या नाही बर का ज्ञानाच्या किल्या.
कितीही मोठे असले तत्वाला जर भंगवल त्याचा काय उपयोग. किती सुंदर बाई असली तिनं नवरा सोडला, किती भारी शिष्य असला यांनी गुरू सोडला त्याचा काय उपयोग.
आईला साप झाला तरी त्याचं काही वाटत नाही. गुरूला कसाही शिष्य असला तरी त्याचा सांभाळ करावा लागतो.
परीसापासी लोखंड गेल तेव्हा त्या लोखंडाच सोनं होतं. ज्यावेळी लोखंडाला गंज येतो ते जर परीसाला लागल तर ते जसच तस राहत. अस आपल्या अंतकरणात जी घाण आहे. तेव्हा गुरूकड गेल तरी काही होणार नाही.
आपली चिंता क्षणाक्षणाला । आहे जगद्गुरु जनार्दनाला।।




निष्काम कर्मयोगी।
प.पू.जनार्दन स्वामींची
अमृतवाणी
537• भाव मात्र गुरुवर एकनिष्ठ ठेवा.तुम्ही जर तुमच्या गुरुची सेवा जर इथंभुत मानली तर देव तुमचे सगळे काम करील.हे बाबा नाही सांगत शास्त्र सांगत,गुरुवर भाव ठेवा.
गुरु ब्रम्हभाव देख।
देव त्याचा मी आज्ञाधारक।
त्यासी पुरवी निजआत्मसुख।
हे
गुरु मर्यादा देख नुल्लंघी देवो॥
गुरुला जो ईश्वर मानील देव त्याचे सगळे काम करील.
538• आपण कोणाच वाईट केल नाही तर आपल कधी वाईट होणार नाही,इथे मात्र लक्ष द्या.
539• अनुष्ठानाशिवाय देह पावन होणार नाही.
540• जागृती स्वप्नी परमेश्वराची आठवण करणाऱ्या मनुष्याच काय वर्णन कराव,देवाकडे जाऊ नका पण त्याच्याकडे जा.
541.जागेपणी देवाच नाव घ्यायच.ते स्वप्नात आल पाहीजे म्हणजे त्याचा व्यवहार खरा आहे.
542• खरा जो जातवान असेल तो चार वाजेचा(उठण्याचा) नियम करील.
543• नियमाला जे महत्व आहे ते कशाला नाही.ज्याने नियम धरला आहे तो दुर्लभ आहे.
544• जो माझ्या नेमा । मी पडेल त्याच्या कामा तुम्ही नियम धराल तर मी तुमच्या कामा येईल नाही तर खुशाल वायले. ॐ जनार्दनाय नमः।।.




।बाबाजी ची अमृतवाणी।।.
545.आपण दुसऱ्याचे गुणदोष पाहत बसलो तर आपल्या एवढ्या पुण्याचा नाश.
546.जो कुणाचे गुणदोष पाहतो,निंदा करतो,त्याच्यासारख पाप नाही.
547.सोप आणि उत्तमात उत्तम दारातोंडी गाय बांधुन गाईच्या शेणात हात घाला तरी तुमचा उध्दार होईल.
548.जन्माला आल्यावर तीर्थयात्रा केल्याशिवाय तुमच पाप निघणार नाही. आपल्याला कित्येक पाप होतात पण कोणते पाप कोठे निघते हे माहीत नाही म्हणुन याकरीता चारी धाम करा म्हणजे पापाचा नाश होईल. मनुष्य मोकळा होईल.
549.बाबाला काही येत नाही. बाबान तिसरीचा अभ्यास करुन स्मशानात बसुन आतापर्यंत आयुष्य काढल आहे. बाबा आखाड्यात नाही, संस्थेत नाही, विद्वान नाही, पंडीत नाही, काही नाही. एक मोडका तोडका भगवान शंकराचा भक्त आहे.
550.ज्याने उपकार केला आहे. त्याला लाथा हाणायला बसले तुम्ही लोक.
551.नुसत भोलानाथ आणि बाबा. दुसरी महत्वाची गोष्ट उद्योग. उद्योग हेच बाबाच गांव, उद्योग हेच बाबाचतीर्थ, उद्योग हेच बाबाच महत्व.
552.हे अमृत आहे. ज्या वस्तु बाबांनी सांगीतल्या या जर तुम्ही केल्या काय मजाल काळाचे दाभाड - फोडुन टाकील. काळाची टाप नाही बाबाच्या माणसाला हात लावायची, पण बाबासारख वागा.
553.जगाला इमानी माणसाची गरज आहे. तुम्ही इमान धराल तर तुम्हाला पाया पडुन घेऊन जातील.
554.ज्या माणसाच्या तोंडात नेहमी शिव्या असतील त्याच्या पुण्याचा नाश कितीही विद्वान का असेना.
555.नित्यनेमाने रोज जो नाम जपेल त्याचासारखा या त्रैलोक्यात कोणी नाही.
.ॐ जनार्दनाय नमः।।




। प.पू.जनार्दन स्वामींची।
अमृतवाणी
556*निरपेक्षाच्या हातचा यज्ञ म्हणजे काय बाबा.निष्काम जर यज्ञ झाला,जेवढे येथील खातील, पेतील त्यांचा उद्धार होईल. कारण महाप्रसाद आहे. तो महापुरुषांचा हातचा आहे. महापुरुष म्हणजे कोण जो कधी कोणाच काही घेत नाही.
557*रामेश्वर तीर्थ फार भारी आहे. महादोषी लोक तेथे जावुन आपल्या दोषाच क्षालन करतात.
558*जे मानासाठी पानासाठी हापापलेले लोक आहे, त्यांच्या मानाने अभिमानाने त्यांचाच नाश होईल.
559*मानाचे पानाचे वैभवाचे हापापलेले यांच्याने काय धर्माचरक्षण होत
दोषी, वैरी, निंदा करणाऱ्या मानसाला पुण्य नसते.
560*संत कसे पाहिजे त्यांना सन्मानाची इच्छा नको.
561*शिव हे दोनच अक्षरे आपल्याला तरणोपायाचे आहे. या जगात दुसर कोणी नाही

आपल भय नाहीस
करणारा तोच आहे
562*दोन बायकांचादोन गुरुंचा व्यवहार हा खोटा आहे.
563*विषय आनंद हा क्षणिक आहे. विषय आनंद ज्याने सोडला तो परम आनंदात जातो.....ॐ जनार्दनाय नमः।।.

8

......अमृतवाणी
बाबाजी ची अमृतवाणी
564• गुरुचरणाचे स्मरण करुन स्नान केल्यास सर्व तीर्थात स्नान केल्याचे पुण्य मिळते.
565• संतांना तुमच्यापासुन काय लाभ आहे? तुम्ही त्यांना दुःख द्या, सुख द्या, काहाही द्या तरी ते तुमच्यावर दयाच करतील.
566• तुम्ही संतांकडे जशी भावना घेऊन जाल तसेच तुम्हाला फळ मिळेल.
567• तुम्ही नुसत म्हणतात बाबा काहीतरी वाट काढा.पण आपण काय करतो हे तुम्ही कधी पाहता का?
जो माझ्या नेम, मी पडेल त्याच्या कामा.
568• कर्म रोग जात नाही, पण तो सुध्दा संतसेवेने जाऊ शकतो.
569• सन्मानाची इच्छा न करणे ह्या गोष्टी अनंत पुण्याचे ढीग असतील तर सापडतील.खरे संत सन्मान स्वीकारणार नाही.
570.ब्रम्ह आणि सद्‌गुरुचे पाय समान आहे.त्यांचे पाय सापडले तर सर्व साधने साध्य होतील.
571• बालपणी ज्या मुलामुलीना संतांचा सहवास घडला आहे त्यांच्या पुण्याच काय वर्णन कराव.
572.सद्‌गुरुचे चरणात सर्वतीर्थ सर्व व्रते असतात.
573.कितीही मोठे दोष असले तरी अनुष्ठानाने त्या दोषाचा नाश होतो.
574• बायाहो अंधारात तांबड्यात लवकर उठा सडा समार्जन करा,तुमच्या घरात दरिद्र्या कधी येणारच
नाही.घरात अखंड लक्ष्मी वास करील.तिला ढकलुन दिले तरी ती जाणार नाही.

7

......अमृतवाणी
|| निष्काम कर्मयोगी.
प.पू.बाबाजींच्या
अमृतवाणीतुन
575.कोण कसा वागतोज्याच्या त्याच्या प्रारब्धाने वागतो.
576• अग्नी पूजेने चित्तशुध्दी होते. विकार नष्ट होतात. वैराग्य प्राप्त होते.
577• ब्रह्मदेवाला नचुकवणारे कर्म संत चुकवतील.
578• जर तुम्ही बंगला बांधून तयार करतात तस शिव मंदिर तयार करून दाखवा. तर तुम्ही शिवाच्या जातीचे.
579• गीता, भागवत या दोन्ही गोष्टी सोडून कोणतही शास्त्र चालत नाही हे अगम्य हे शास्त्र आहे.
580.कोणी जन्माला आला असेल तर केलेले कर्म भोगण्यासाठी आला आहे.
581• बाबा जरी गेले, तरी बाबाने तुमचा पाया करून ठेवला आहे पण विधी घ्या.
582• देवाचं नामस्मरण करणाऱ्याला कधी त्रास होणार नाही. नामस्मरण आणि साधू आवडेल केव्हा काही पुण्य
असेल तेव्हा.
583.परमेश्वर तुम्हाला केव्हा मानील,तुम्ही संताकडे जाल तेव्हा.
584.गुरु ब्रह्मभाव देख | देव मी त्याचा आज्ञाधारक |
त्यासी पुरवी नित्य आत्मसुख । हे गुरू मर्यादा देख नुल्लंधी देवा ।।
अशा गुरूच तुम्ही भजन केल तर गुरूला तुम्हाला काही करावं लागणार नाही.

9

......अमृतवाणी
॥ॐनमो भगवते जनार्दनाय।।
बाबाजींची अमृतवाणी
शांत बसा, शांत बसा हे पहा बाबा काही
विद्‌वान पंडीत नाही. एक तोडके मोडके बोलतात, पण हे तुमच्या प्रेमास्तव बोलतात बाबा एक अत्यंत साधारण भगवान सदाशिवाचे भक्त आहे.
स्मशनामध्ये राहत आहे. करिता शांत बसा तर धर्म म्हणजे काय?
खरा तो एकची धर्म |जगाला प्रेम अर्पावे ।।
खरा धर्म बायांनी माणसांनी बाळगावा की
सर्वांवर प्रेम करावे एकमांकावर प्रेम करा. जगाची सेवा करा जगी जनार्दन आहे. म्हणून जनतेची सेवा करा हा खरा धर्म आहे. तसेच धार्मिक कोणाला म्हटलं आहे?
तर माता, पिता, गुरु, स्त्री, संतान, शरणांगत
अतिथी, अभ्यंगत अन अग्नि यांची सेवा करणाऱ्याला धार्मिक गृहस्थ म्हणतात. म्हणून प्रथम आईची सेवा करा, बापाची करा. खरा बाप आळखा, खरा पिता सद्‌गुरु आहे. म्हणून साधुंची सेवा करा त्यांची जर सेवा केली तर तुम्हाला काही कमी पडणार नाही. जैन लोंकात साधुंची सेवा करतात तर कोट्याधीश होतात. अशी संत सेवा फार महत्वाची गोष्ट आहे. खरी जगाची
सेवा करणारा भगवान सदाशिव आहे. तो विश्वाचा आधीचा आहे. विद्‌याचं बीज पण तोच आहे. सर्वांचे भय काढणारा देखील तो आहे. म्हणून त्या सदाशिवाची भक्ती करणे, पुजा करणे हा सर्व श्रेष्ठ धर्म सांगितला आहे. स्कंध पुराणात पहा.
दृष्टान्त - ज्या वेळेस समुद्र मंथन झाले
त्या वेळेस वासुकीचा दोर मंदाराचलाची रवी केली व तोंडा कडून देव लागले व शेपटाकडून राक्षस.अशाप्रकारे घुसळण्याचे काम चालू झाले तर चौदा रत्न निघाले, लक्ष्मी कामधेनु, अमृत वगैरे असे करता करता त्या घुसळ्याने त्या वासुकीला उष्णता निर्माण झाली. त्यांचे शरीर तापले गेले व त्याला त्यांच्या विषाची गरळ आली. ही फक्त भगवान शंकरांनी पाहिली. तर त्यांनी विचार केला की जर गरळ खाली या पृथ्वीवर पडली तर संपूर्ण
पृथ्वी होरपळून जाईल. मग त्यांनी पार्वतीला हाक मारली हे पार्वती, ही पहा त्या वासुकीची गरळ आलेली आहे. ही जर पृथ्वीवर पडली तर सर्व जग खलास होईल. तर ही मी घेऊ का ? तर पार्वतीने सांगितले , घ्या देवा. म्हणून भगवान शंकरांनी त्यांच्या तोंडाला तोंड लावून ते सर्व विष आपल्या शरीरात घेतले. कंठापर्यंत ते विष भरले, पहा काय जीव म्हणाला असेल. काय यातना असेल. थोडासा विंचू चावतो तर थैयथैय नाचतो , एवढं विष घेतले, जगाकरता घेतले म्हणून-
जगाच्या कल्याणा संताच्या विभूती ।
देह कष्टवितो परोपकारे ।
जगाच्या कल्याणासाठी एवढे हलाहल विष
घेतले. सर्व अंगाचा दाह झाला. तर हिमालयात गेले सर्प गळ्याला बांधला, चंद्र घेतला डोक्यावर बेलाचे पान घेतले त्यामुळे ती पिडा थोडी थोडी कमी झाली. म्हणून

शेवटी प्रभुरामचंद्रचे नांव घेतले. राम राम राम
मग शांत जीव झाला म्हणून याला म्हणतात धर्म
जगाच्या कल्याणासाठी देह गेला तरी चालेल.
देह जावे अथवा राहो ।
पांडुरंग, सदाशिव दृष्टी भावो ।।

10

.......अमृतवाणी
प.पु.बाबाजींच्या
अमृतवाणीतुन
585* परमेश्वराने आधी धर्म उत्पन्न केला मग जनता उत्पन्न केली.
586* देवाच्या आधी धर्म आहे, धर्म हाच तुम्हाला तारील.
587* ब्रम्हा, विष्णू, महेश यांची आपण प्रार्थना करतो,पण ब्रम्हा, विष्णू, महेश धर्माची प्रार्थना करतात.
588* आपला देव धर्म आहे धर्म जर नाही तर देव नाही.
589* प्राणिपात, स्तुती,उपासना,चरणांचे स्मरण, कथा श्रवण, सर्व कर्म समर्पण
हे सहा अंग जर असतील तर त्याला भक्त म्हणतात.
590* या जगात जर आपण तरत असाल तर धर्माच्या आधारे तरतो.
591* ब्रम्हा, विष्णू,महेशाला सुध्दा गणपतीची पूजा करावी लागते.
592* धर्माचे अंग, भक्तीचे अंग, सत्याचे अंग हे जर तुम्ही बाळगले तर मोठे मोठे लोक जन्माला येतील.
593* आपल जर शील सुटल तर आपण काही उपयोगाचे नाही.
594* सतत उद्योग करायला भाकरीची ताकद नाही लागत त्याला शीलाची ताकद लागते.
595* ज्याच्यात शील असेल तो रात्रंदिवस उद्योग करील.
596* सुख कशात आहे जो कष्ट करतो, भाजी भाकर खातो यात सुख आहे.
597* कोणाच्या कुटाण्यात सुख आहे का ? कोणाच्या निंदेत सुख आहे का ? कामात सुख आहे.
598* कष्ट करायला ताकद लागते ही ताकद शरीराची, पैशाची, राजाची नाही, तर
599* सतत उद्योग करा आणि शील रहा, या दोन्ही वस्तू एकत्र करण याला बेरीज म्हणतात.
600* मैत्रीत मत्सर घालणे हा खर्च आहे. 601मैत्रीतून मत्सर काढा याला वजाबाकी म्हणतात.
602* निंदेसारख कोणतेही पाप नाही. निंदा म्हणजे बदामाच्या शिऱ्यामध्ये जहर आहे. शिरा खायला गोड
लागतो निंदा करायला गोड लागते पण शेवटला विष चढलं की टपकन मरून पडतो
603* निंदा करायला गोड लागते पण त्याचा सत्यानाश होईल निंदासारख पाप नाही.
ताकद शील पाहिजे.
ॐ जनार्दनाय नमः।।

Sunday, July 12, 2020

9

.......अमृतवाणी
श्री बाबाजीची
अमृतवाणी
आपण जे कर्म करतो तेच आपल्याला प्राप्त होते. ब्रम्हदेव जरी आला तरी
कर्म चुकणार नाही.
कर्माचा लेखा न चुके ब्रम्हदीका ।
ब्रम्हदेवाला सुध्दा कर्म चुकणार नाही तर आपली काय मात पण तेच कर्म
कर्माचा लेखा संत तोडती देखा ।
ब्रम्हदेवाला न चुकणारे कर्म ते संत चुकवतील कशामुळे तर
ब्रम्हांडाची धनी । संतांनी केला ऋणी ।
कर्म - शारिरिक क्रिया म्हणजे कर्म. मुळात निर्माण झाले ते कर्म.
विकर्म- म्हणजे मिश्र कर्म करणे. चांगले आणि वाईट कर्म करणे याला विकर्म म्हणतात.
अकर्म- अकर्म म्हणजे अनासक्त बुध्दीने केलेले कर्म यात काही फळाची इच्छा नाही. कर्म करायला आपल्याला अधिकार आहे. पण फळ घ्यायचा अधिकार नाही. या अकर्मात कोणी आले नाही. सर्व लोक कर्म आणि विकर्म यातच अडकले. देव अर्जुनाला म्हणतात. तु युध्द कर. नका देवा हे कर्म मला करायला लावू नका. हे मला भोगावे लागेल. जे पेरले ते उगवते आणि केले ते भोगावे लागते. देव म्हणतात ज्यांना कर्म कळाले नाही ते अधोगतीला गेले. देव म्हणतात हरभरे आण. ऐका बरका या गोष्टी नव्हे युक्त्या आहेत. या युक्तीत जर तुम्ही सादर झाले तर तुम्ही बरोबर परब्रम्हाला जाल. हरभरे भाजून घेतले, त्याचे फुटाणे झाले. पेर म्हणे आता. हरभरे भाजले ते उगत नाही. मला कर्म अर्पण केले ते भोगावे लागणार नाही. शुभ अशूभ कर्म असो तु मला अर्पण कर.
जैसे जैसे कर्म करिता । तैसे तैसेचि फल देता।
चौघे पुत्र दशरथाला । अंतकाळी तो एकला।
दशरथाच्या पोटी राम आले, काही चालल का? दशरथाला चार पोर असून एकटा का गेला ?
राम जवळ असतांना कर्म चुकल का? डोक्यात घ्या बाबांनो, तुम्ही काय करता तुम्हाला कळत नाही. जे तुम्ही कराल तेच तुम्हाला प्राप्त होईल.
जन्माचे ते मुळ पाहिले शोधून | दुखःशी कारण जन्म घ्यावा ।
कश्यपाने यज्ञ केला वरूणाच्या शंभर गायी आणल्या. परत दिल्याच नाही कोणाच काही आणल असेल तर ते ठेवू नका. ते अत्यंत दुख आहे. बाबाची हात जोडून विनंती आहे. तुम्हाला वाटत असेल मुंगीला टोला मारला ती काय करणार. पण ती जे करील ते ब्रम्हदेव करीत नाही. देव गरीबाचा जो कैवारी आहे तो श्रीमंताचा नाही. कश्यपाने वरूणाच्या गायी आणल्या सांगीतल जाय म्हणे देत नाही काय करायच ते कर, त्यामुळे वरूणाने शाप दिला तु गवळी होशील आणि कैदेत पडशील तेव्हा वसुली होईल. सांगा कर्म

चुकल का?
केवढे कृष्णाचे वैभव। बंदी पडले वसुदेव ।
कर्म करे सो कोई ना करे
ज्याचे कर्म घेती झोले । तेथे कोणाचे न चाले ।
आपली चिंता क्षणाक्षणाला । आहे जगद्‌गुरु जनार्दनाला !!

9

अमृतवाणी
|| निष्काम कर्मयोगी.
प.पू.बाबाजींच्या
अमृतवाणीतुन
604.कोण कसा वागतोज्याच्या त्याच्या प्रारब्धाने वागतो.
605• अग्नी पूजेने चित्तशुध्दी होते. विकार नष्ट होतात. वैराग्य प्राप्त होते.
607• ब्रह्मदेवाला नचुकवणारे कर्म संत चुकवतील.
608• जर तुम्ही बंगला बांधून तयार करतात तस शिव मंदिर तयार करून दाखवा. तर तुम्ही शिवाच्या जातीचे.
609• गीता, भागवत या दोन्ही गोष्टी सोडून कोणतही शास्त्र चालत नाही हे अगम्य हे शास्त्र आहे.
610.कोणी जन्माला आला असेल तर केलेले कर्म भोगण्यासाठी आला आहे.
611• बाबा जरी गेले, तरी बाबाने तुमचा पाया करून ठेवला आहे पण विधी घ्या.
612• देवाचं नामस्मरण करणाऱ्याला कधी त्रास होणार नाही. नामस्मरण आणि साधू आवडेल केव्हा काही पुण्य असेल तेव्हा.
613.परमेश्वर तुम्हाला केव्हा मानील,तुम्ही संताकडे जाल तेव्हा.
गुरु ब्रह्मभाव देख | देव मी त्याचा आज्ञाधारक |
त्यासी पुरवी नित्य आत्मसुख । है गुरू मर्यादा देख नुल्लंधी देवा ।।
अशा गुरूच तुम्ही भजन केल तर गुरूला तुम्हाला काही करावं लागणार नाही. देव आपोआप तुमच

16

अमृतवाणी
निष्काम कर्मयोगी जगत्गुरु जनार्दन स्वामी मौनगिरीजी महाराजांची
॥श्री ॐ नमो भगवते जनार्दनाय ||
* अमृत वाणी
614*तुम्हाला भक्ति प्राप्त करुन घ्यायची असेल तर संतांकडे जा!
615*भक्ती हा सर्वात उत्तम लाभ आहे. पण आपल्याला त्याचा सांभाळ करता आला पाहिजे. आपण जर निर्मळ बनलोच नाही तर ती थांबणार नाही.
616*गुरुच्या पाठीशी रहा, बरे होईल, गुरुच्या पुढे जाऊ नको.
617*ज्याच्यापाशी पैसा आहे तोच सोन घेईल, ज्याच्या पाशी भक्ती आहे तोच या विधीचा महिमा पाहिल. एक अक्षर म्हणजे ब्रह्मांड मोलाचे आहे. लक्षात ठेवा.
618*देव भक्ताशिवाय कोणाचाही उध्दार करीत नाही यात भक्तीचा विजय आहे.
619*देण्यात जो आनंद आहे तो घेण्यात नाही. हाच खरा आनंद आहे.
620*भागवत् वाचा. भांबावलेली वृत्ती शांत होते. भागवत् खांब आहे. भागवत् बाबाजींचे काळीज आहे. कुणालाही तारुन जावयाचे असेल तर भागवत् पहा.
621*तपश्चर्या केली आणि दुर्गुण अंगात राहिला, त्याचा काही उपयोग नाही.
622*ज्याच्यापाशी ब्रह्मचर्य आहे, त्यांना आत्मा जाणण्याची नजर असते.
623*साधुपाशी गेल्यावर ते भांडणे मोडतात, 624*कुटाळापाशी गेल्यावर ती भांडणे लावतात.
ज्या घरात आई-बाप मुलांना चांगले शिकवितात त्यात कलह होत नसतो.
625*परधन, परान्न, परस्त्री, परनिंदा यांचा त्याग करावा. दया, क्षमता, शांती, नम्रता यांचा अंगीकार करावा.
626*भाविकांनी श्रध्दापूर्वक तनाने श्रमदान, मनाने उपासना व दानाने दानधर्म करावा.
627*ऋषी व कृषी सेवा हीच खरी ईश्वरसेवा होय.
628*अन्नदानाशिवाय दुसरे सत्कर्म नाही.
माझी विभुती हीच कामना पूर्ती.
629*गायी, गोपाळांचे रक्षण हेच धर्माचे रक्षण.
630*शिलात-सत्य, सत्यात-धर्म, धर्मात-सदाचार, सदाचारात-बळ, .बळात - लक्ष्मी, लक्ष्मीत-जय निश्चित जाणावा
631*श्रध्दा, आधार, शुध्द आचरण, शुध्द मन, शुध्द विचार याने परमसुखाची प्राप्ती होते.
632*जो सांभाळील वाणी-पानी तोच खरा ब्रह्मज्ञानी.
633*ज्याच्या मुखी विधी जाण तोच खरा भाग्यवान.
634*तडाखे सहन करणाराच ताठ उभा राहू शकतो.

Thursday, July 16, 2020

14
edited

अमृतवाणी
॥ॐ नमो भगवते जनार्दनाय ॥
अरे राग असावा धर्माचा धर्म सुटला तर राग यायला पाहिजे.
एक जण बाबाना अंदरसूली म्हणाला बाबा तुम्ही फार रागीट आहात बाबानी विचारले कसे तर त्यांनी सांगितले की,तुम्हाला एवढा राग झाला की,तुम्ही संसारच सोडून दिला हा राग काय कमी आहे? असे काही लोक हूशार असतात खरं आहे ते भाऊ हा राग आला बर का तू म्हणतो खरं आहे. ती वैजयंती शिळा झाली पण त्या ब्राम्हणाला पुन्हा पश्चाताप झाला. अरे आपल्या मुलांचा आपण विचार केला नाही. सुनेला शाप दिला म्हणून त्या ब्राम्हणानी त्या मुलाला म्हटलं,मला क्षमा कर मी तुझ्या बायकोला शाप

दिला ती शिळा झाली.तरी तू दुसरे लग्न कर. मुलगा म्हणाला बाबा मी काही जनावर नाही असे करायला
अरे दोन बायका फजिती ऐका दो नारी ज्या घरी तेथे पाप वास करी असे म्हटलं आहे मी तसाच राहीन.
सुर्याची उपासना करील. म्हणून बाबा असे सारं घर सदाचारी होते तर पूढे काय झालं? तो मुलगा रोज सुर्यनारायणाची प्रार्थना करायचा व त्याला प्रार्थनेत प्रसन्न होऊन सुर्य त्याला एक कमल फुल द्यायचा.
ते फुल तो त्या शिळा झालेल्या आपल्या पत्नीला वाहावयाचा . ते कमळ मात्र सुकत नव्हते,असे नियम त्याने बारा वर्षे केले. सुर्यनारायण प्रसन्न झाले. त्या त्याच्या भक्तीस्तव ती वैजयंतीच्या शिळेवर
टाकलेली फुलांची माळ करुन त्या वैजयंतीने देवाच्या गळ्याला घातली. ती माळ आहे भगवान
नारायणाच्या गळ्यात. गळा वैजयंती माळा कासे पितांबर असे देवाचे वर्णन आहे. म्हणून ही कशाची
शक्ती आहे तर सदाचाराची म्हणून सदाचारी रहा तेने भगवंताची भेट होईल व आपला उध्दार होईल. जसा
त्या शिलावर टाकलेले प्रेमाचा कमळाचा हार त्या वैजयंतीने देवाला घातला तसा भागवतामध्ये सांगितले
आहे ती नऊ लक्षणे आहे. भक्ताने नऊ रत्नाचा हार गुरुच्या गळ्यात घाला.
१) सन्मानाची इच्छा करु नये- कोणाचे फुलसुध्दा घेऊ नये.
२) निर्ममता-मायेच्या तावडीत जाऊ नये.
३) निर्मत्सरता- कोणाचाही मत्सर करु नये.
४) दक्षता-कार्यात दक्षता असावी.
५) गुरुशी आप्तपणा - आपले आप्त गुरु आहे.
६) सत्य आणि पवित्र भाषण बोलावे - तर खरंच व पवित्र बोलावे.
७) जिज्ञासुपणा- जिज्ञासुपणा पाहिजे.
८) निश्चलता-साधनात दृढता असावी.
९) अनुसया- कधी कोणाचे वाईट करु नये.
आपला आप्त गुरु आहे,दक्षता कामात असावी. अशा प्रकारे हे नऊ रत्न आहे. या नऊ रत्नांचा
जो हार करील व आपल्या सद्गुरुच्या गळ्यात घालील त्याचे काय वर्णन करावे तोच खरा,भक्त तोच
ज्ञानी,तोच विद्वान तोच शहाणा म्हणून बाबा असा आचार धरा. तरच आपल्याला सुख मिळेलं.आधी
कष्ट मग फळ सदाचाराने वागा,देवाचे नाव घ्यावं,आपला उद्योग करा. मग काय होते ते पहा.
त्र्यंबकेश्वर महाराज की जय ‖ हृदयेश्वर महाराज की जय ‖ गोपालकृष्ण भगवान की जय ‖
श्री गुरुदेव दत्त दत्त दत्त- आलख निरंजन
सद्गुरु जनार्दन स्वामी (मौनगिरीजी) महाराज की जय ।।



अमृतवाणी
‖ निष्काम कर्मयोगी.
प.पू.जनार्दन स्वामींची
अमृतवाणी
635*संतांनी सांगितल्यावर ऐकत नाही ते काही कामाचे नाही.
636*अग्नी पुराणात अस सांगितल आहे हे झाड रोपवले पाहिजे. काय पुण्य सांगाव.
637*नर्मदा नर्मदा म्हटल्यानंतर कल्पापर्यंत पुण्याचा समुदाय संपणार नाही
638*कितीही काही प्रसंग जरी आला तरी मनुष्यान न गांगरता, नामस्मरण सोडू नये
639*आईला बापाला धर्माला सोडून संसार करायचा हा व्यर्थ व्यवहार आहे.
640*सर्व भुतमात्रामध्ये परमेश्वर भरलेला आहे ही बावाची भावना आहे. शत्रू, मित्र, शीत, उष्ण हे बाबाला सम आहे.
641*या पंचमहाभुतांची पंचप्राणांची आहुती दिली तर मग त्याच्या संपतीला पार नाही.
642*साधकाने कधीच कोण काय करतो हे पाहू नये
643*संत महतांच्या प्रेतयात्रेचा महिमा काय वर्णन करावा. जो आईबापाची प्रेतयात्रा काढतो जो साधुची गुरुची
प्रेतयात्रा काढतो शेवटचा ठेवा आहे. जेवढा उत्सव करायचा तेवढा करा खुशाल करा. पापाचे पाप निघुन जातील
644*संत जवळ असतात माणसाला पारख नसते. संतांना मानणे न मानणे हा श्रद्धेचा प्रश्न नाही हा सुकृताचा
(पुण्याचा) प्रश्न आहे. तुकाराम महाराजांना तुक्याशिवाय बोलत नव्हते.
645*भगवंतांनी भागवतात सांगीतल मला मन्य संन्यासी नको, संसारी नको, माझा मार्ग जो चालेल तो माझा.
646*धातुला जो शियीत नाही त्याची पवित्रता किती वर्णन करावी नागेश्वरीमध्ये (अंदरसुल) कोणाच्या मुंदीचा
(अंगठीचा) हात लागला तरी बाबा स्नान करीत होते.
647* कधीही मी केल अस म्हणू नये अस मी म्हटल की आटपल.
ॐ जनार्दनाय नमः।।

निष्काम कर्मयोगी।
प.पू.बाबाजींच्या
प.पू.जनार्दन स्वामी महाराज
यांच्या प्रवचनातुन संकलीत
अमृतवाणीतुन
635* तुम्ही म्हणाल आमच्या कर्मात होत. ते झाल अरे कर्म जातील. कर्म काही मोठ अवघड नाही.कर्माचा लेख
कोणत्याही माणसाला चुकला जाणार नाही.
कर्माचा लेखा न चुके ब्रह्मदीका । कर्माचा लेखा संत तोडीता देखा ।।
कर्म हे ब्रह्मदेवाला चुकल नाही. संतांच्या मनात आल तर ते कर्माला तोडु शकतात कारण त्यांच सामर्थ्य तस
आहे. ब्रह्मदेवाने लिहलेले कर्म संत बंद करतील.
समर्थाचा शिक्का । धाक पडे ब्रह्मदीका ।
636* संत बरोबर तुमचे कर्म हाणुन पाडतील पण तुम्ही काय करता
सांगती ऐकत नाही । हा इंद्रीयाचे ऐकतो । जेव्हा चित शुध्द
झाले नाही त्याला गुरु करील काय।।
637* खरे दास पृथ्वी फाटली, आकाश गडगडल तरी देवाची सेवा सोडणार नाही. याला दास म्हणतात.

638* गर्व नाही, अभिमान नाही, ताठा नाही, चोरी नाही, भामटेपणा नाही, परधन नाही, परान्न नाही, परस्त्री नाही, परनिंदा नाही हे दास्यत्व करतील.
तुझ्या नामाचा महीमा, तुज न कळे मेघश्यामा ।
639* या नामाचा महीमा देवाला सुध्दा कळला नाही.
640* गाईसारखा पवित्र आणि परोपकारी कोणी नाही.
641* नाही काही तर गाय घेऊन दारातोंडी बांधा, तिला मुठभर चारा टाका, तिच्या शेणात गोमुत्रात हात गेला तरी तुम्ही तरुन जाल. नाही काही निदान या चोवीस गायत्रीच नाव तरी घ्या. तुम्ही तराल.
642* तुम्ही देवाच नाम घेणार नाही संतांच दर्शन करणार नाही तर तुमचा सर्व संसार फोलकट आहे.
643* राम शिव हे महामंत्र आहे. आधी त्यांच नाव घ्या.
आवडी आदरे आदी आले नाम । त्याने झाले माझे सर्व काम । .ॐ जनार्दनाय नमः।।

Thursday, July 23, 2020

12

......अमृतवाणी
निष्काम कर्मयोगी।
प.पू.बाबाजींच्या
अमृतवाणीतुन
प.पू.जनार्दन स्वामी महाराज
यांच्या प्रवचनातुन संकलीत
644* यज्ञशिष्ट म्हणजे यज्ञाचा उरलेला प्रसाद. खाल्ला तर अमृतासमान.
645* केवळ देवाचे नाव घेणे हे शुध्द भजन आहे. राम राम राम, शिव शिव शिव.
646* ज्याच्यामध्ये नम्रता असेल त्याच काय वर्णन कराव? परमेश्वर त्याने कोंडुन ठेवला.
नम्र झाला भुता। त्याने कोंडीले अनंता ।।
647* ज्याची नम्रता ढासळली, ज्याला राग आला त्याच सर्वस्वी पालथ झाल.
648* मनुष्य नम्रता राखील तर मनुष्य परमार्थ साधीतो. ही नम्रता पार परमपदाला नेईल.
649* संत कोणत्याही जातीत कुळात जन्मले तरी संतच आहे.
650* भजन हे मनुष्याला तारत म्हणुन माणसाने भजन कराव. नम्रता धरावी म्हणजे सगळ प्राप्त होत.
651* जीवाचा उध्दार करायचा असेल तर भक्तीच करावी लागेल.
652* आपण जी विधी केली आहे ती रोज म्हणायला केली आहे.
653* तांबड्यात पहाटे उठायच, त्याला बळ म्हणतात.
654* काय लागते ते आपल्याला पाहीजे. लोकांना नको. इथेच वाद आहे सगळा.
655* ज्याच्या अंतःकरणात लोकांकरीता पाहीजे तो तरला. ज्याच्या अंत:करणात स्वार्थ आहे, सकाम आहे, आपल बर होवो, दुसऱ्याचे वाईट होवो तो मरला.
656* आंधळ्या पांगळ्याच जरुर रक्षण करायला पाहीजे. लई सोहळा देवाला आवडतो. हाच सोहळा गाडगे बाबांनी केला.
657* पाऊस असो, पाणी असो, थंडी असो, वारा असो,शीत असो, आग असो, सुख असो, दुख असो देवाचा नियम सोडु नये.
जो माझ्या नेमा । मी पडेल त्याच्या कामा।।
658* जे आपल संचीत असेल ते आपल्याला मिळेल. दुसर काही मिळणार नाही. इथे ज्यावेळेस गुरुच्या शब्दावर भरवसा बसतो त्या मनुष्याचा राग, द्वेष, निंदा, वैर ,आपोआप जातो.ज्याचा भरवसा बसतो की आपण जे केल तेच मिळत. त्याच्या व्यतिरिक्त अणुरेणु पेक्षा कमी जास्त मिळत नाही. असा ज्याचा गुरुवर श्रध्दा भाव बसला की तो तिथे जाऊन लीन झालाच.
.ॐ जनार्दनाय नमः।। .

Saturday, July 25, 2020

10

......अमृतवाणी
निष्काम कर्मयोगी।
प.पू.बाबाजींच्या
अमृतवाणीतुन
प.पू.जनार्दन स्वामी महाराज
यांच्या प्रवचनातुन संकलीत
659* यज्ञशिष्ट म्हणजे यज्ञाचा उरलेला प्रसाद. खाल्ला तर अमृतासमान.
660* केवळ देवाचे नाव घेणे हे शुध्द भजन आहे. राम राम राम, शिव शिव शिव.
661* ज्याच्यामध्ये नम्रता असेल त्याच काय वर्णन कराव? परमेश्वर त्याने कोंडुन ठेवला.
नम्र झाला भुता। त्याने कोंडीले अनंता ।।
662* ज्याची नम्रता ढासळली, ज्याला राग आला त्याच सर्वस्वी पालथ झाल.
663* मनुष्य नम्रता राखील तर मनुष्य परमार्थ साधीतो. ही नम्रता पार परमपदाला नेईल.
664* संत कोणत्याही जातीत कुळात जन्मले तरी संतच आहे.
665* भजन हे मनुष्याला तारत म्हणुन माणसाने भजन कराव. नम्रता धरावी म्हणजे सगळ प्राप्त होत.
666* जीवाचा उध्दार करायचा असेल तर भक्तीच करावी लागेल.
667* आपण जी विधी केली आहे ती रोज म्हणायला केली आहे.
668* तांबड्यात पहाटे उठायच, त्याला बळ म्हणतात.
669* काय लागते ते आपल्याला पाहीजे. लोकांना नको. इथेच वाद आहे सगळा.
670* ज्याच्या अंतःकरणात लोकांकरीता पाहीजे तो तरला. ज्याच्या अंत:करणात स्वार्थ आहे, सकाम आहे, आपल बर होवो, दुसऱ्याचे वाईट होवो तो मरला.

671* आंधळ्या पांगळ्याच जरुर रक्षण करायला पाहीजे. लई सोहळा देवाला आवडतो. हाच सोहळा गाडगे बाबांनी केला.
672* पाऊस असो, पाणी असो, थंडी असो, वारा असो,शीत असो, आग असो, सुख असो, दुख असो देवाचा नियम सोडु नये.
जो माझ्या नेमा । मी पडेल त्याच्या कामा।।
673* जे आपल संचीत असेल ते आपल्याला मिळेल. दुसर काही मिळणार नाही. इथे ज्यावेळेस गुरुच्या शब्दावर भरवसा बसतो त्या मनुष्याचा राग, द्वेष, निंदा, वैर ,आपोआप जातो.ज्याचा भरवसा बसतो की आपण जे केल तेच मिळत. त्याच्या व्यतिरिक्त अणुरेणु पेक्षा कमी जास्त मिळत नाही. असा ज्याचा गुरुवर श्रध्दा भाव बसला की तो तिथे जाऊन लीन झालाच.
.ॐ जनार्दनाय नमः।। .

Monday, July 27, 2020

12

......अमृतवाणी
बाबाजींची
अमृतवाणी
"ब्रह्ममुहूर्त महात्म्य"
674• आज काय कराव आयुष्यभर बाबा ते सांगत आहेत.
उठा उठा साधू संत, साधा आपुल्याले हित ।
हित ते करावे देवाचे चिंतन, करोनिया मन शुद्धभावे॥
तसे बाबा तुम्हाला आल्या जन्मापासून सांगतात की, सकाळीच उठा. हे जर तुमच्या टाळक्यात बसत नाही तर सर्व साधने निष्फळ आहेत.
675• साडेतीन वाजून काही काळाने ब्रह्मनाडी जागृत असते. या नाडीच्या प्रहरावर जो कोणी सद् पासी जाणार नाही त्याचा सारा व्यवहार फोलकट आहे. या टाईमाला जो उठेल तोच योगी, तोच पंडीत तोच शहाणा तोच साधक.
676• जो खरा भाग्यवान असेल तो सकाळी उठलाच पाहीजे अन् आम्ही त्यालाच आरूळ्या ठोकू नामदेव महाराज म्हणतात.
उठा उठा साधू संत, साधा आपुल्याले हित ।
जाईल हा नरदेह, मग कसा भगवंत ॥
677• असे टेंपरवारी लपून छपून गंज अनुष्ठान करतात. पण ते काही टिकत नाही, का टिकत नाही तर पहा हे झोपलेले.
678. सकाळी उठायलाच पाहीजे तुम्ही सकाळी उठले आणि कोणतेही काम नाही केले तरी चालेल पण हे ऐवढे काम करायला पाहिजे, सगळं तुम्हाला मिळालं. जर तुम्ही कोर्टात तारखेवर गेला नाही तर तुमचा फैसला होणार नाही, तसं देवानं सांगितल आहे, हया टाईमाला जागा तुमचा फैसला मी करतो. याच टाईमाला मी तुमच्यापाशी येईल बाकी मग मी येणार नाही.
679• सकाळचा टाईम देवाचा आहे, हा टाईम हरीनाम अमृताचा हा सगळ्या तिथीचा शुभ आहे. सकाळी उठणे म्हणजे सत्ययूग आहे. या सत्ययुगामध्ये सत्य काम होतील.
जागला तो जगला, झोपला तो मेला ॥
जे बाबाकडे आले असतील, बाबाचे खास बोध आचरणात असतील, तर पहाटे उठलाच पाहिजे.
680• बाबाची जर सेवा करून बाबाची काही तत्व घेतील तर तेच देव बनतील, पण केव्हा...
उठा उठा साधू संत, साधा आपुल्याले हित ॥

Wednesday, July 29, 2020

11

......अमृतवाणी
प.पू.जनार्दन स्वामींची॥
अमृतवाणी
वेरुळ क्षेत्र काशीपेक्षा गहृभर जास्त आहे. हे स्थान फार मोठ आहे. महाज्योर्तिलिंग आहे.
आपल्या हृदयात ईश्वर आहे. तो आपल्या कडुन सर्व करुन घेतो आणि आपणच म्हणतो आम्ही करतो.
जगात जनार्दन आहे. जनतेची सेवा करील तोच खरा.
जिकडे भक्त आहे तिकडे देव आहे. जिकडे देव आहे तिकडे लक्ष्मी आहे. लक्ष्मी आहे तेथे जय आहे.
सुर्य उदयापासुन रात्री आठ वाजले तरी उद्योग सोडु नका, इतके सुखी व्हाल खायला माणसं मिळणार नाही.
सर्वात उंच वस्तु म्हणजे विद्याधन आहे.
सगळे कामं होतील पण शंकराचं मंदिर फार अवघड आहे. तिथे काही सत्पुरुषाचा साधुचा थोडा आधार असला तर ते कार्य कडाला जातं.
विद्यार्थी माझे देवता आहे. मास्तर हे त्यांचे साथीदार आहे या दोन लोकांवर बाबाला खुप आनंद आहे.
शैव मंत्र कोटी आहे. वैष्णव मंत्र कोटी आहे. सोपं साधन नमः शिवाय.

681• शिष्य पर म्हटला तर पुत्रासमान, तर पुत्रासमान नाही. पुर्ण ब्रह्म पहावे असं वेदांनी म्हटले आहे.
शिष्य देखावे पुत्रासमान। हे स्मृती वाक्य असे प्रमाण।
दृष्टी देखोनेणो गौण।शिष्य देखे पुर्ण ब्रह्म॥

682• जो शिष्याला माणुस मानील तो गुरु नाही.
683• खरे जर शिष्य असतील समभावनेने एकमेकावर प्रेम करुन एकमेकांच्या साहाय्याने आश्रमाची मोठी शक्ती वाढवतील. खोटे जर असले तर एकमेकांच्या द्वेषाला पात्र होऊन सगळे झगडे तंटे करुन लयाला नेतील.
684• शिष्य कसे असतात गुरुची समदृष्टी शिष्याची पण समदृष्टी.
685• काय सांगावे आमच्या बाबा लोकांचे वर्णन हे माझ्यापाशी देव आले आहे. माणसं नाही.
686•आत्मज्ञान झाल्याशिवाय कोणतीही विद्या उपयोगी पडणार नाही.विद्यावान झाले, पंडीत झाले, वाद भेद गेलाच नाही तर हे अपायात पडले आहे. ज्यांना काहीच येत नाही ते भगवंताचे नाम घेतात त्यांना उपाय झाला.
687• ह्या शरीरात मुख्य हा प्राण आहे. त्याला ब्रह्म म्हटल आहे, आत्मा म्हटल आहे, शिव म्हटल आहे. प्राण श्रेष्ठ मानला आहे.
भुतदया ठेवा मग काय उणे। प्रथम साधन हेचि असे॥
आपल्याला दया ही प्राप्त झाली पाहीजे. काहीच ऊण पडणार नाही तुम्हाला.ही दया आपण बाळगतच नाही. भुत प्राण्यावर दया करण्याऐवजी त्यांच्यावर क्रोधायमान होऊन सगळ्या पुण्याचा नाश करतो.
.ॐ जनार्दनाय नमः।। .





बाबाजीची अमृतवाणी
688.बाबा तुमच्या पाया पडतात आपल चित्त शुध्द करा. हा रोग काढा.
689• ध्यानाने देवाकडे नेले, झोपेने काळाकडे नेले.
690• आपले सद्गुरु त्यांचे आशीर्वाद त्यांची दृष्टी आपल्यावर असेल म्हणजे निषीद कर्म आपल्या अंगावर येऊशकत नाही.
691• तुमचा उद्धार अखेर संतांजवळच आहे. संत म्हटले अस कर तर देवाला तस करावेच लागते. देव काही करीत नाही. देत नाही, घेत नाही. सगळा खेळ हा संतांचा आहे म्हणुन माणसाने संतांना सोडु नये.
692• मंत्र हा कामा येतो. ज्या देवाचा मंत्र जपला असता ती देवता माणसाचं रक्षण करते.
693• काही लोक गोशाळा बांधतात. पहा हा किती उंच दर्जाचा मार्ग आहे. हे अत्यंत उत्कृष्ट साधन आहे. नुसती एक गाय जरी दारापुढे ठेवली तरी सगळ्या पापांचा नाश होतो.
694• जो लोकांना जेऊ घालतो त्याच्या सगळ्या पापांचा नाश होतो.
695• पांडुरंग आणि महादेव एकच आहे यात बदल मानु नका.
696• जो आईची सेवा करील त्याला काहीच कमी पडणार नाही.
697• आपण केलेला गुरु कधीही सोडायचा नाही असा ज्यांचा सिध्दांत आहे ते श्रीमंतांचे श्रीमंत आहे. बाकी पैशासाठी व खाण्यासाठी इकडे तिकडे भटकणारे लोक गंज आहे.

698• वाचेने लोकांच वाईट उच्चारणे म्हणजे वाचेच सगळ सत्व गेल.
699• परस्त्री गमन केल म्हणजे सर्व पुण्याचा नाश होतो. विषय असा आहे केवढा मोठा पराक्रमी, ज्ञानी, दाता, पंडीत शहाणा जरी असला या विषयापायी तो अधोगतीला जातो. त्याला स्मरणशक्ती राहत नाही. भगवान त्या ठिकाणी जात नाही.
700. दुराचारी लोकांच नाव घेतल तरी जीभेला दोष होतो.
पुण्यवंत व्हावे,घेता सज्जनांची नावे।
701• तुकाराम, एकनाथ, ज्ञानेश्वर महाराज हे पुण्याचे डोंगर आहेत, यांच नाव घेतल्यावर आपल्याला पुण्य मिळत.

ॐ जनार्दनाय नमः।।



निष्काम कर्मयोगी।।
श्री. बाबाजींची अमृतवाणी
लोखंडाच्या पेटीत सोनं ठेवलेले असल्यास तिला सोन्याची पेटी म्हणतात, असा यो गुरू सर्व देवाया यकाराय नमो नमः तसा भगवान भोलेनाथाचा बोध ज्यात आहे, त्याला गुरू म्हणले आहे.
संगती संग पुण्याहा संगती संग दोषाहा.
पुण्यवाणाला जर जवळ घेतले तर आपलं बर होतं, पाण्याला जवळ घेतलं तर आपलं बरं होत नाही. पण त्याचं पाप आपल्यात घूसत परीक्षीत राजाने जरासंघाचा मुकुट घातला. कोणाची वस्तू वापरू नका. सहा तासाच्या आत विकार निर्माण होतो. सहा तासाने परीक्षीताला दुर्बध्दी सुचली. मरेल साप उचलला ऋषी ध्यानाला बसले होते त्यांच्या गळ्यात तो टाकला.
विनाशकाले विपरीत बुध्दी. हे कशामुळे झाले तर संगतीमुळे म्हणून
बाबा सांगतात परक्याची वस्तू वापरू नका. त्या साधूचा मुलगा जवळ होता त्याने शाप दिला, अरे दृष्टा तु मरेल साप माझ्या पित्याच्या गळ्यात टाकला. जाय तुला ७ दिवसाचे आत सर्पदंश होईल. एकदा ऋषी लोकांचं वाक्य सुटलं म्हणजे कोणताच पर्याय नाही. झालच पाहिजे.
तप केल्याशिवाय काही दैव प्राप्त होणार नाही. तप म्हणजे काय कामाचा त्याग करणे याला तप म्हणतात. काम गेला की क्रोध गेलाच पाहिजे. जसं गर्भवती बाईच मुंडक कापल्यावर बाई गेली अन गर्भही गेला. काम गेला की क्रोध गेलाच. ज्याने गेलेन काम, क्रोध, तोचि साधू जगी सिध्द.
नारदानं वाल्या कोळ्याला उपदेश केला तर तो पटकन निर्मळ झाला. या आधी पुष्कळ साधुंनी त्याला सांगितले. पण त्याने ऐकले नाही. कारण का? असे वाक्य सांगणाऱ्यांमध्ये शक्ती लागते. ताकद लागते. धर्मराज देवाला म्हणतात, देवा, माझ्या हातून ही गोत्र हत्या घडली. त्याच्या निवारकरणात यज्ञ करायचा. सगळ्या पापाचं नाश यज्ञ. देव म्हणतात अखेर तुम्ही कोरच राहीले. एवढं तुम्हाला गीतेचा

| उपदेश करून कर्ममांड निर्णय केला तरी तुम्ही अजून पाप करू राहीले. गीतेला पतबोधीनी म्हणतात.
बोध केला पण तयाला पतपाणी आहे.
धन पाणी सांभाळा तर प्या बोधाचा उपयोग.
गहु पेरायचा ठरला तर काळी मुसमुसीत जमीन पाहिजे. पाणी पाहिजे, तेव्हा तो कमराला हातीला लागतो. उत्पन्न येते अन् जर जमीन दगडा खगडाची हरळीची गवताची त्यात गहू जर पेरला आणि बी पाहिलं नाही तर त्याला होतील दोन चार पायल्या. प्याला दहा पोते त्याने कशी केली इकडे लक्ष द्या. त्याने कोणत्या योजना केल्या याकडे लक्ष द्या.

मना सज्जना भक्ती पंथेची जावे ।
मना सज्जना लोकांशी तोषवावे।
मना तु भक्तीच कर, लोकांना आनंद दे
त्रास देऊ नको तर तु सज्जन नाही तर दुर्जन
I|कर कटावरी तुळशीच्या माळा । ऐसें रूप डोळा दावी हरी ।।

Tuesday, August 4, 2020

भागवत ग्रंथ महिमा
702*भागवत बाबांचं काळीज आहे. सिर्फ भागवत वाचा बाकी काही करु नये. भागवत घोका, झाडाखाली,
वनात, डोंगरात वाचलेल चांगलं, भांबावलेली वृत्ती शांत होते.
703*भागवतात काय निघेल याचा पत्ता नाही. जे तिन्ही लोकात आहे ते भागवतात आणि जे भागवतात आहे ते तिन्ही लोकांत नाही.
704*कोणालाही तरुन जायच असेल तर भागवत पहा.
705*भागवत हे बाबांच्या बेंबीच देठ आहे. शेतात झोपडी बांधून भागवत वाचावा.
706*भागवत वाचणाराच पूण्य काय सांगू तुम्हाला, आपल्या जीवाच जीवन भागवत आहे. भागवत हा खांब आहे.
707*भागवत हा श्री बाबाजींचा आवडता धार्मिक ग्रंथ आहे.
.
सूचना-
श्री. बाबाजी कोण होते? त्यांनी काय केले? त्यांना का निष्काम कर्मयोगी म्हणतात? त्यांनी गुरुकुले व आश्रमांची स्थापना का केली? श्री. बाबाजींनी श्रमदान, अन्नदान, गोदान, भुदान, रक्तदान का करण्यास सांगितले ? हे जाणून घेण्यासाठी तरी फक्त एकदा ... फक्त एकदा प.पू. संत जनार्दन स्वामी याचे जीवनचरीत्र ...... शांतीची फुलं. एकदा तरी वाचा बरं का.

Wednesday, August 5, 2020

7

[8:37:48 AM]अमृतवाणी
प.पु.बाबाजींच्या
अमृतवाणीतुन
708* परमेश्वराने आधी धर्म उत्पन्न केला मग जनता उत्पन्न केली.
709* देवाच्या आधी धर्म आहे, धर्म हाच तुम्हाला तारील.
710* ब्रम्हा, विष्णू, महेश यांची आपण प्रार्थना करतो,पण ब्रम्हा, विष्णू, महेश धर्माची प्रार्थना करतात.
711* आपला देव धर्म आहे धर्म जर नाही तर देव नाही.
712* प्राणिपात, स्तुती,उपासना,चरणांचे स्मरण, कथा श्रवण, सर्व कर्म समर्पण
हे सहा अंग जर असतील तर त्याला भक्त म्हणतात.
713* या जगात जर आपण तरत असाल तर धर्माच्या आधारे तरतो.
714* ब्रम्हा, विष्णू,महेशाला सुध्दा गणपतीची पूजा करावी लागते.
715* धर्माचे अंग, भक्तीचे अंग, सत्याचे अंग हे जर तुम्ही बाळगले तर मोठे मोठे लोक जन्माला येतील.
716* आपल जर शील सुटल तर आपण काही उपयोगाचे नाही.
717* सतत उदयोग करायला भाकरीची ताकद नाही लागत त्याला शीलाची ताकद लागते.
718* ज्याच्यात शील असेल तो रात्रंदिवस उयोग करील.
719* सुख कशात आहे जो कष्ट करतो, भाजी भाकर खातो यात सुख आहे.
720* कोणाच्या कुटाण्यात सुख आहे का ? कोणाच्या निंदेत सुख आहे का ? कामात सुख आहे.
721* कष्ट करायला ताकद लागते ही ताकद शरीराची, पैशाची, राजाची नाही, तर
722* सतत उद्योग करा आणि शील रहा, या दोन्ही वस्तू एकत्र करण याला बेरीज म्हणतात.
723* मैत्रीत मत्सर घालणे हा खर्च आहे. मैत्रीतून मत्सर काढा याला वजाबाकी म्हणतात.
724* निंदेसारख कोणतेही पाप नाही. निंदा म्हणजे बदामाच्या शिऱ्यामध्ये जहर आहे. शिरा खायला गोड

लागतो निंदा करायला गोड लागते पण शेवटला विष चढलं की टपकन मरून पडतो
725* निंदा करायला गोड लागते पण त्याचा सत्यानाश होईल निंदासारख पाप नाही.
ताकद शील पाहिजे.
ॐ जनार्दनाय नमः।।



अमृतवाणी
।।बाबाजी ची अमृतवाणी।।
726* निंदा म्हणजे केवळ नर्क आहे.
727* हैव त्याला दैव, करट्यांना झोप.
728* करू नका काही संत संग करा, पुर्वीचा तो दोहरा उगवेल.
729* परमेश्वराचे नाम पापाचे पर्वत जरी असेल तरी नाहीसे करणारे आहे म्हणून
पापाचे पर्वत भस्म नाम अगणित
झालेले पाप देवाच्या नावाने दुरुस्त होते पण श्रद्धा भावना पाहिजे आवड पाहिजे.
आवडीने भावे हरीनाम घेशी,तुझी चिंता त्याशी सर्व आहे.
आपली चिंता परमेश्वराला आहे म्हणून ज्याच काम त्याने कराव दुसऱ्याचे करू नये. देव जर आपली
चिंता करत आहे तर आपण त्याच चिंतन करा
आता माझी चिंता। तुज नारायणा ।।
730*आपल कस होईल लेकर- बाळं कसे जगातील ते मरतील जगतील हे काहीच करू नका. आहे ते
सगळ प्रारब्धाच्या हाती प्रारब्ध भोगल्याशिवाय गती लागत नाही
731* संचिताच्या मागे सर्व आहे. काही होणार नाही जे संचित आहे ते भोगावे लागेल
प्रारब्धे जोडे धन, प्रारब्धे वाढे मान,प्रारब्धे पुत्राकांता जाण, प्रारब्धे अन्न अच्छादण
732* अन्नसुद्धा प्रारब्धाशिवाय तुम्हाला एक घास मिळणार नाही.
733* देव लोकाध्यक्ष,देवाध्यक्ष आहे. ज्याचे जे आहे ते त्याला देतो दुसर काही देऊ शकत नाही.
734* असा भावनेचा प्रश्न आहे बाबा परमेश्वर फार भावनेच्या आधीन आहे. ज्यांना जसी भावना तसा परमेश्वर आहे.
735* अंतःकरणात दुषितपणा आहे. संतापासी गेले काय ? देवापासी गेले काही उपयोग नाही त्याला भावच लागतो.
देव भावचा भावाचा, नाही कोणाच्या बापाच्या.
ॐ जनार्दनाय नमः।।